# प्रकरण दुसरे

# संकल्पनात्मक संदर्भचौकट आणि पध्दतीशास्त्र

# प्रकरण २ रे

# संकल्पनात्मक संदर्भचौकट आणि पध्दतीशास्त्र
# ( Conceptual Framework And Methodology )

**प्रस्तावना :**

प्रस्तूत प्रकरणात सदर अभ्यासाची संकल्पानात्मक संदर्भ चौकट आणि अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन करण्यात आले आहे. या प्रकरणात तीन प्रमुख विभाग आहेत. पहिल्या विभागात 'स्त्रियांचे सबलीकरण' ही सकंल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. दुस-या विभागात समर्पक उपलब्ध संशोधन साहित्यांचे परिशीलन करून त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तिस-या विभागात अभ्यास पध्दती विषयीचे तपशीलवार, विवेचन केले आहे.

## विभाग पहिला

## २.१ स्त्रियांचे सबलीकरण

२१ व्या शतकाची सुरूवात भारत सरकारने २००१ हे महिला सबलीकरण वर्ष जाहिर करून केली आहे. स्त्री-पुरूष समानतेबददल आज जेवढी जागृती दिसते तेवढी यापूर्वी कधीही नव्हती. जोवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असलेले स्त्रियांचे दुय्यमत्व संपुष्टात आणून स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आज स्त्री चळवळीच्या माध्यमातून जसा चालविला जात आहे. तसाच तो सरकारी पातळीवरही चालविला जात आहे. भारतीय राज्यघटनेने बहाल केलेली स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी सरकारी पातळीवर जे प्रयत्न सुरू झाले ते प्रामुख्याने स्त्रियांचा विकास अथवा स्त्रियांचे कल्याण या दृष्टीकोनातून. पहिल्या पाच पंचवार्षिक योजनांमध्ये हाच दृष्टीकोन कायम होता. त्याचाच

एक भाग म्हणून १९५३ मध्ये केंद्रीय समाजकल्याण खात्याची निर्मिती करण्यात आली. १९५८ मध्ये दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री शिक्षणासाठी एक समिती नेमण्यात आली. त्याचाच परिपाक म्हणून तिस-या योजनेत शिक्षण, आरोग्य, पोषक आहार, कुंटूब नियोजन इत्यांदीना महत्व देण्यात आले.

सत्तरच्या दशकात राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय पातळीवर अमुलाग्र बदल होऊ लागले. १९७१–७३ या कालखंडात ग्रामीण स्त्रियांनी दुष्काळी परिस्थितीविरूध्द तर शहरी मध्यमवर्गीय स्त्रियांनी महागाई विरूध्द आंदोलन सुरू केले. राष्ट्रीय चळवळीच्या कालखंडात स्त्रियांचा सार्वजनीक जीवनात मोठया प्रमाणात सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तो थंडावला परंतू ७० च्या दशकात त्यास नवे धूमारे फुटू लागले. त्यातच भर म्हणून 'भारतीय स्त्रियांचा दर्जा' हा अहवाल १९७५ मध्ये प्रकाशित झाला. त्यातून भारतीय स्त्रियासंबधीचे अतिशय विदारक चित्र पुढे आले. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रांनी 'आंतरराष्ट्रीय महिला' वर्ष म्हणून जाहीर केले. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांचा पाश्चात्य स्त्री मुक्तीवादी चळवळीशी व विचारांशी संपर्क आला. त्यातून अनेक स्त्री संघटना '**स्त्रीवादी**' जाणीवा घेऊन उभ्या राहिल्या याचाच परिपाक म्हणून सहाव्या योजनेत महिला कल्याण आणि विकास यापेक्षा स्त्रियांचा सहभाग यावर भर देण्यात आला. परंतू स्त्रोला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून मान्यता देण्याचा दृष्टीकोन शासकीय पातळीवर विकसित झाला नाही.

१९७५ नंतर हळूहळू काही बदल होऊ लागले १९७५ ते १९८५ या कालखंडात मेक्सिको, कोपन हेगन, नैरोबी इथल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांनी स्त्री चळवळीला बळकटी दिली. स्त्री चळवळीने या प्रश्नाकडे एका वेगळया दृष्टीकोनातून पहावयास सुरूवात केली. त्यांनी विकासाच्या संकल्पनेलाच आव्हान देण्यास सुरूवात केली. ज्या विकासात्मक दृष्टीकोनामुळे स्त्रियांच्या जीवनात कोणताही बदल झाला नाही. ते विकासाचे

परिमाण बदलून एक पर्यायी विचार, एक नविन दृष्टीकोनाची चळवळ, स्त्री संघटना मांडू लागल्या हा दृष्टीकोन होता. 'स्त्रियांच्या सबलीकरणाचा' या दृष्टीकोनाचा प्रभाव शासनावर पाडण्यात स्त्री चळवळीला यश आले. परिणामी सातव्या योजनेत स्त्रियांचे सबलीकरण ही संकल्पना पहिल्यांदाच मांडण्यात आली. व पुढील दोन योजनांमध्ये त्यांना बळकटी मिळाली. राष्ट्रीय महिला आयोग, बिजिग परिषद या माध्यमातून स्त्रियांच्या सबलीकरणाच्या चर्चेला चालना मिळाली. ( भारती पाटील २००१: ५९)

## २.२ स्त्रियांचे सबलीकरण म्हणजे काय ?

या विषयी अनेक विचारवंतानी आपली मते व्यक्त केली आहेत त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न खालील परिच्छेदात केला आहे.

एस. पी जैन (Quoted from Kamble Archana, 2000 :15,16.) यांच्या मते "'सामाजिक आर्थिक आणि बौध्दिक साधन संपत्ती अधिक प्रमाणात प्राप्त करण्याची स्त्रियांना संधी उपलब्ध करून देऊन, त्यावर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित व्हावे हे स्त्रियांच्या सबलीकरणाचे उदिद्ष्ट आहे." ते पुढे असे ही म्हणतात की, विषमतेवर आधरित पारंपारिक स्वरूपाच्या स्त्री-पुरूष संबधात परिवर्तन घडवून आणून ते समतेवर आधारित असतील अशी व्यवस्था निर्माण करणे हे स्त्री सबलीकरणाचे मुख्य उदद्दीष्ट आहे. पारंपारिक लिंगभेदावर आधारित श्रम विभाजनाच्या व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे आणि खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील विविध प्रकारची साधन सामुग्री स्त्रियांना प्राप्त होईल. आणि त्यांचा खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढेल अशी स्थिती निर्माण करणे हे स्त्रियांच्या सबलीकरणाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

**पिलाई जया कोठारी** (१९९५:१) (Quoted from Kamble Archana, 2000 :15,16.) यांच्या मतानुसार "स्त्रियांचे सबलीकरण ही एक क्रियाशील आणि बहुआयामी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे स्त्रियांना आपल्या व्यक्तिमत्वाची आणि क्षमतांची पूर्ण जाणीव होते. स्त्रियांना स्वतःच सबल / सक्षम बनावे लागेल. याचा अर्थ असा की जीवनाच्या सर्व क्षेत्रातील स्त्री–पुरूष विषमतेची कारणे समजून घेऊन ती नाहिशी करून पुरूषांबरोबर समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांना स्वतःच प्रयत्न करावे लागतील."

**रौलॅंडस** (१९९७:४९,५०) (Quoted from Kamble Archana, 2000 :16,17.)यांच्या मतानुसार "सबलीकरण म्हणजे केवळ निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणे नव्हे तर निर्णय प्रक्रियेतील स्थानावर राहण्याची आपल्यात पात्रता आहे" अशी जाणीवही त्यांच्यात निर्माण होणे होय.

स्त्री सबलकरणाच्या अभिजात संकल्पनेनुसार पुरूषांबरोबर समानता प्रस्थापित करण्यासाठीच्या स्त्रियांच्या क्षमतेत वाढ करणे अभिप्रेत आहे असे शर्मा एस.. एल. (२०००:२२) यांनी म्हटले आहे. त्यांनी स्त्रियांच्या सबलीकरणाच्या क्रमबध्द अशा पाच पातळया असल्याचे निदर्शनास आणले आहे. त्या पाच पातळया म्हणजे १) भौतिक कल्याण २) साधन संपत्ती आणि फायदे प्राप्त करण्याची संधी ३) स्त्री–पुरूष विषमता निसर्गनिर्मित नाही अशा जाणिवेची निर्मिती ४) निर्णय प्रक्रियेतील सहभाग ५) स्वतःच्या जीवनावरील आणि सत्तास्थानांवरील स्त्रियांचे नियंत्रण

**विद्या सुतार** (२००२: ६१, ६२) : यांच्या मते स्त्री सबलीकरण म्हणजे महिलांमध्ये क्षमतेच्या जाणीव निर्मिती बरोबरच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे. त्यांच्या हक्कासंदर्भात जाणीव निर्माण करणे, तसेच सामाजिक , आर्थिक , राजकिय घडामोडीमध्ये त्यांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभागाबददलची जाणीव करून देणे, त्यांना

आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनविण्याची संपत्तीत समान वाटा देण्याची, शिक्षण देण्याची, स्वातंत्र्यबदद्ल व हक्कांबददल जागरूक करण्याची प्रक्रिया होय.

भारती पाटील (२००१ , ५९, ६०) यांनी स्त्री सबलीकरणाच्या संकल्पनेची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते "स्त्री पुरूष" समानतेची ध्येये प्रत्येक देशात वेगवेगळया रितीने व्यक्त करण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असणे. निर्णय प्रकियेत सहभागी होण्याची समानसंधी मिळणे आणि समान लाभ मिळणे अशा गोष्टी स्त्री-पुरूष समान्तेत अभिप्रेत असतात अनेकदा निर्णयाचे व निवडीचे स्वातंत्र्य प्रत्येकाला बहाल केले असले तरी व्यवहारात मोजक्याच व्यक्ती हे स्वातंत्र्य अनुभवू शकतात.

आज कुटूंबापासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत राजकीय सत्ता पुरूषांच्या हाती केंद्रीत आहे. परिणामी सर्व प्रकारच्या साधनसामूगीच्या मालकीपासून स्त्रियांना वंचित ठेवले जाते आणि सामाजीकरणातून त्यांना दुय्यम स्थान स्विकारण्यास भाग पाडले जाते. त्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांचे हक्क, अधिकार नाकारले जातात. त्यांच्याबाबत भेदभाव केला जातो. त्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांची पिळवणूक होते. त्यांच्यावर अत्याचार होतात म्हणजेच नियंत्रण, भेदभाव, आणि पिळवणूक ही पुरूष प्रभुत्वात्मक सत्तेची वैशिष्ठये आहेत.

ही सत्तेची विषम वाटणी बदलून सत्तेचे फेरवाटप करणे, स्त्रियांना आर्थिक, सामाजिक व राजकीय सत्ता मिळवून देणे ही स्त्री-पुरूष समानतेसाठीची आवश्यल्ता आहे. या दृष्टीकोनातून सबलीकरणाची संकल्पना मांडली जाऊ लागली. 'स्त्रियांचे सबलीकरण' या संकल्पनेत स्त्रियांना अधिक सत्ता बहाल करणे, त्यांच्या स्वतःच्या जीवनावर स्वतःची सत्ता प्रस्थापित करणे व स्त्रियांच्या जीवनवरील पुरूषांची सत्ता कमी करणे हे अभिप्रेत आहे. सबलीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये स्त्रियांना आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील निर्णय घेण्याची क्षमता विकसित करता येइल. त्यांचा आत्मविश्वास वाढेल, उत्पादन साधनांवर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित करता येइल,

स्त्री–पुरूषांमधील भेदभावाची जाणीव त्यांच्यात विकसित होऊन एक व्यक्ती म्हणून स्त्रियांना स्व अस्तित्वाची जाणीव होईल.

या साठी सर्वात प्राथमिक गरज आहे. ती स्त्रि यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्याची आज भारतात बहूतांश स्त्रि या आर्थिकदृष्टया परावलंबी आहेत बहूतेकांकडे अर्थाजनाचे साधन नाही. घरात आणि शेतात स्त्रि या आपले श्रम खर्ची घालत असल्यातरी त्या श्रमाचे मूल्य केले जात नाही. घरातील काम शेतातील काम तिचे असते पण घर किंवा शेत तिच्या मालकिचे असत नाही. यासाठी आवश्यकता आहे ती संपत्तीमध्ये स्त्री आणि पुरूषांचा समान वाटा असण्याची, त्यातून सत्तेची फेरवाटणी काही प्रमाणात निश्चितच शक्य आहे.

'सबलीकरण' 'स्त्रियांचे सबलीकरण' आणि 'स्त्रियांचे राजकीय सबलीकरण' या विषयीच्या विविध विचारवंताच्या दृष्टीकोनांचे विश्लेषण करून स्त्रियांचे सबलीकरण या संकल्पनेत खालील बाबींचा अंतर्भाव होतो असे अर्चना कांबळे , (२०००, १५,१६) यांनी म्हटले आहे.

१) स्त्रियांच्या सबलीकरणाची प्रकिया ही क्रियाशिल आणि बहूआयामी प्रक्रिया असून त्यात निर्णय प्रक्रियेतील विविध स्थाने प्राप्त करण्याची संधी स्त्रियांना उपलब्ध करून देणे, स्त्रिया सक्षम होतील अशी परिस्थिती निर्माण करणे आणि स्त्रियांच्या क्षमतांचा त्यांना वापर करता येईल अशा पात्रतांचा विकास करणे या प्रकियेत अभिप्रेत आहे.

२) इतर व्यक्तींना प्रभावित करण्याची आणि स्त्रियांच्या इतर व्यक्तींशी आणि समुहांशी असणा–या संबधांवर प्रभाव टाकण्याची क्षमता स्त्रियांमध्ये निर्माण करणे.

३) स्त्रियांमध्ये असणा–या सर्व प्रकारच्या पात्रता आणि क्षमतांचा स्त्रियांना विकास साधता येईल अशा परिस्थितीची निर्मिती करणे

४) निर्णय प्रक्रियांमधील स्थाने आपण भुषवू शकतो असा विश्वास स्त्रियांमध्ये निर्माण करणे

५) खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रांमध्ये समानतेवर आधारित असे स्त्री–पुरूष संबध निर्माण करणे

६) ज्या परिस्थितीत स्त्रिया स्वतःला सबल किंवा सक्षम बनवू शकतील अशी परिस्थिती निर्माण करणे.

सहकारी दूध संस्था स्त्रियांना सबल/सक्षम बनविण्याच्या प्रक्रियेत कोणती भूमिका पार पाडत आहेत हे समजून घेणे हे प्रस्तूत अभ्यासाचे प्रमुख उदिद्ष्ट आहे. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या संकल्पनेचा वर वर्णन केलेला अर्थ लक्षात घेऊन सहकारी दूध संस्थाची स्त्रियांच्या सबलीकरणाच्या भूमीकेतील प्रकिया आपणास समजून घेता येईल.

## विभाग २

## संशोधन साहित्याचे परिशीलन

प्रस्तुत अभ्यासाची संकल्पनात्मक संदर्भ चौकट थोडक्यात स्पष्ट केल्यावर या दूस–या विभागात प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या उपलब्ध संशोधनात्मक साहित्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मनोषी मित्रा (१९८६ : २०–४६) यांनी आध्रं प्रदेश येथील महिला सहकारी दूध संस्थेचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी आंध्र प्रदेश येथील दूध संस्थेच्या महिलांबाबतच्या कार्यकमांचा अभ्यास केलेला आहे. आंध्र प्रदेश डेअरीच्या महिलांबाबतच्या कार्यकमाचा हेतू

हा होता की, गरीब स्त्रियांना संघटीत करून, महिला दूध संस्था स्थापन करून त्यातील महिलांना शास्त्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षण देऊन जनावरांची देखभाल व दुग्ध उत्पादन, पशुखाद्य, चारा, दूध काढणे इत्यांदी बदद्ल) आधूनिक पध्दतीने हा व्यवसाय कसा वाढवता येतो या बध्दलचे प्रशिक्षण देणे.

या अभ्यासात त्यांनी दोन स्थितीतील गोष्टीवर भर दिला आहे एक म्हणजे पारंपारिक समाजात या व्यवसायातील महिलांवर पुरूष व्यक्तीकडून कसा दबाव आणला जात होता. आणि महिलांचे या दुग्ध व्यवसायात अधिक शारिरीक श्रम असूनही महिलांना त्यापासून मिळणारी प्राप्ती किती कमी आहे. हे त्यांनी दाखवून दिले दुसरी गोष्ट अशी की अलिकडील काळात आधूनिक साधने /उपकरणांचा वापर होऊन असे प्रकल्प राबवून गरीब महिला दूध उत्पादकांना फायदे व्हावेत असा त्यांच्या अभ्यासाचा हेतू होता.

महिला दूध उत्पादक आर्थिक दृष्टया अधिक प्रमाणात स्वतंत्र बनल्या, त्यांचे त्यांच्या उत्पन्नावर अधिक नियंत्रण आहे. पण त्यांच्यावर पुरूषी आणि खेडयातील नेत्यांचे अजुनही वर्चस्व आहे. असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

मार्टीचेन आणि गीता अत्रेय (१९८६:४७:६९) यांनी आंध्रप्रदेशमधील भग्वतूला विश्वस्त प्रतिष्ठान या बिगर शासकीय संस्थेच्या महिलांसाठीच्या दूध संस्थेचा अभ्यास केला आहे.

ही विश्वस्त संस्था यल्लमनचिल्ली तालुक्यात गेल्या दोन दशकापासून ग्रामीण विकासासाठी कार्यरत आहे. भग्वतूला विश्वस्त प्रतिष्ठानच्या संस्थेची ध्येय धोरणे प्रकाशात आणने, ग्रामीण महिलांसाठी राबवल्या जात असलेल्या संस्थेच्या कार्यक्रमाची माहिती प्रकाशित करणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

या संस्थेद्वारे ग्रामीण गरीब शेतकरी महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिक पाठबळ दिले जाते. पशुपालन व शेती व्यवसायात प्रगती करण्यासाठी तसेच जनावरांच्या

देखभालीसाठी पशुवैद्यकीय प्रशिक्षण सदर संस्थेकडून ग्रामीण महिलांना दिले जाते. तिथे गरीब स्त्रियांना दुग्ध व्यवसाय वाढविण्यासाठी, जनावरांच्या चारापाण्यासंदर्भात, तसेच दुध काढणे इत्यादी गोष्टीबददल प्रशिक्षण दिले जाते. अशा प्रशिक्षणामुळे दूध उत्पादनाच्या पारंपारीक पध्दतीऐवजी आधुनिक शास्त्रीय पध्दतीचा अवलंब स्त्रियांनी केला आहे. असा प्रमुख निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे.

मार्टीचेन आणि अनिला ढोलकीया (१९८६:७० १०६ ) यांनी सेवा या संस्थेच्या मार्फत चालविल्या जाणा-या महिला संस्थांचाही अभ्यास केला आहे. सेवा ही संस्था गुजरातमध्ये कार्य करते. सेवा म्हणजे (SEWA–Self Employed Women's Association)) सेवा संस्थेने १९७९ मध्ये असा निर्णय घेतला की जनावरांची देखभाल करणा-या दुग्धउत्पादनात खूप परिश्रम करणा-या स्त्रियांची उन्नती झाली पाहिजे. यासाठी सेवा संस्थेने नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड ( एन डी डी बी) च्या सहकार्याने अहमदाबाद जिल्हयातील ढोलकां या दुष्काळग्रस्त भागाचा विकास करण्यासाठी ढोलका तालुक्यातील ५ गावांची निवड आपल्या विकास कार्यक्रमात केली.

या संस्थेने ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायातील स्त्रियांना रोजगार पुरवून त्यांची मालमत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी गरीब स्त्रियांना कर्ज पुरवठा केला स्त्रियांची या व्यवसायातील कष्ट करण्याची वृत्ती व जिदद् बघून सेवा संस्था प्रभावित झाली व त्या संस्थेने या व्यवसायातील ग्रामीण गरजू लोकांना मदत करण्यासाठी संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवून विस्तार केला. पारंपारिक पध्दतीने होत असलेला पशुपालन व दुग्धव्यवसाय बदलून प्रशिक्षणाद्वारे ग्रामीण उत्पादकांना अधिक आधूनिक माहिती उपलब्ध केली व आर्थिक पाठबळ पुरवले.

गरीब स्त्रियांना संघटित करून त्यांच्या दूध संस्था स्थापन करण्यात कोणकोणत्या अडचणी येतात यावर या अभ्यासाने प्रकाश टाकला आहे. या अभ्यासावरून शासकीय आणि बिगरशासकीय संस्थाना मार्गदर्शक ठरतील अशा सूचना या अभ्यासातून मिळाल्या आहेत.

एका अशासकीय संस्थेने तामीळनाडूत चालविलेल्या दूध संस्थेचा अभ्यास गीता अत्रेय (१९८६:१०७, १२३) यांनी केला आहे

काही गरीब महिला दूध संस्था स्थापन करण्यास इच्छूक होत्या. संस्था स्थापन झाली. पण त्या संस्थेतील पुरूष सचिव हा सभासदांची आर्थिक फसवणूक करणारा होता. त्यामुळे ती संस्था जवळ जवळ बंद पडण्याच्या स्थितीत होती. पण तेथील महिलांनी तिचा पुनर्जन्म केला आणि आज ती संस्था महिला पूर्णपणे स्वतंतत्रपणे चालवितात.

गरीब ग्रामीण महिलांच्या दूध संस्थाना व्यवस्थित पणे कार्य करण्यास अडथळा आणणा-या खालील चार गोष्टी आहेत असे वरील चार व्यष्टी अध्ययनांतून ठळकपणे निदर्शनास आले आहे. Case Study

१) महिलांना दूध संस्थेचे सभासदत्व देण्यास अडथळा आणने

२) गरीबी आणि त्यामूळे त्वरित आर्थिक लाभ मिळावेत ही अपेक्षा

३) अशिक्षितपणा

४) कनिष्ठ जातीतील महिलांना पुढे येण्यास होणारा सामाजिक आणि राजकीय प्रतिकार

अनिला ढोलकीया (१९८४,ISST) यांनी सफेद क्रांतीमध्ये ग्रामीण स्त्री या विषयावरील शोधनिबंधात ग्रामीण महिला शेती व्यवसाय व दुग्ध व्यवसायात किती परिश्रम करतात या बददलची माहिती दिली आहे.

टी आर सिंग (१९८१ ISST ) निर्णय निर्धारण प्रक्रियेतील शेतकरी महिलांची भूमिका आणि दुग्ध व्यवसायातील सहभाग या शोधनिबंधात दुग्धव्यवसाय, जनावरांची देखभाल यांच्या बदद्लच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेमधील स्त्रियांचा आधिकारावर अधिक प्रकाश टाकला आहे.

सुंदर पुष्पा (१९८१: ७९-९८)यांनी खडगप्रघ्रा येथील महिला सहकारी दूध संस्थेचा व्यष्टीवृत्त पध्दतीने अभ्यास केला आहे. त्यांनी महिला सहकारी दूध संस्थांचा ग्रामीण भागातील जीवनावर कसा प्रभाव पडतो हे तपासले आहे, आणि पारंपारिक रितीरिवाजातून बाहेर पडून आज ग्रामीण स्त्री कशी यशस्वी होत गेली आहे. त्याचप्रमाणे कामकरण्याच्या क्षमतेमध्ये स्त्री-पुरूष यांच्यामध्ये पुरूषांपेक्षा स्त्रिया कशा यशस्वी होताना दिसून येतात याचे विवेचन केले आहे.

करमरकर आणि घोष (२००२:४४१) यांनी स्वयंसेवी गटातील महिलांची भूमिका : या विषयावरील शोधनिबंधात स्वयंसेवी गटांच्या सहाय्यामूळे दूध संस्था वाढीला चालना मिळते असे म्हटले आहे. अशा दूध संस्था या ग्राहक आणि सभासदांच्यासाठी उपयोगी आणि प्रभावशाली आहेत. स्वयंसेवी गट, दूध संस्था या स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, जीवनावर परिणाम करतात.

देवकी जैन (१९८०:७०, ७५ (Woments quest for power )यांनी या पुस्तकात गुजरातमधील खैरा येथील महिला दूध उत्पादकांच्या समस्यांचा अभ्यास केला आहे. त्यासाठी खैरा येथील १० खेडयांमधील १२४ महिलांचा अभ्यास केला यातील ब-याचशा महिला या दूधसंस्थाच्या स्वतः सभासद होत्या.

स्त्रिया शेतात व दूग्ध व्यवसायात खूप परिश्रम घेतात असे असूनही पुरूषांपेक्षा अधिक शारिरीक कष्ट करूनही स्त्रिला, पुरूषांप्रमाणे वेतन मिळत नाही. स्त्रिचे श्रम हे एका ठराविक चौकटीत बंदिस्त होतात, असे मत लेखिकेने नोदविले आहे

स्त्रिया, सहकारी दूध संस्था या विषयावर वरीलप्रामणे काही संशोधनात्मक अभ्यास झाले आहेत. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेत सहकारी दूध संस्थाची अत्यंत महत्वाची भूमिका असल्याचे वरील अभ्यासातून अप्रत्यक्षपणे दिसून येते. प्रस्तुत अभ्यासात महिलांच्या सहकारी दूध संस्थेतील सहभागामुळे त्यांच्या सबलीकरणाच्या प्रकियेला कोणत्या प्रकारे चालना मिळते हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबविण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन पुढील भागात करण्यात आले आहे.

## विभाग तिसरा

## संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा

### २.३.१ प्रस्ताविक ( **Introduction**)

या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधनासाठी निवडलेली नेमकी समस्या, संशोधनाची उदिद्ष्टे, संशोधन क्षेत्र, नमुना निवडीची पध्दत, तथ्य संकलासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरणांची रूपरेषा या संशोधन आराखडयाच्या विविध पैलूंचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे.

14420
A

## २.३.२ संशोधन विषयाची निवड (Selection of the Research Topic)

'सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण हा'' प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. हा विषय निवडण्याची दोन कारणे आहेत. मी समाजशास्त्र या विषयीचा एम. ए. स्तरावरील अभ्यास करीत असताना ''स्त्रिया आणि समाज'' (Women and Society, Optional Paper ) हा ऐच्छिक विषय निवडला होता. या विषयाच्या अभ्यासवरून समाजातील स्त्रियांची स्थिती काय आहे ? विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग कसा वाढत आहे याची जाणीप मला झाली त्यामुळे स्त्रियांविषयीच्या अभ्यासात माझी अभिरूची निर्माण झाली.

मी स्वतः एक ग्रामीण स्त्री असून ग्रामीण भागातील स्त्रिच्या सुखदुःखाची तिच्या कष्टाची जाणीव मला आहे. संशोधिका स्वतः कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील डुक्करवाडी या गावची रहिवाशी आहे. सहकारी क्षेत्रातील स्त्रिच्या सेवा क्षेत्राची जवळून ओळख असल्यामुळे सदर अभ्यासासाठी हा विषय मी निवडला.चंदगड तालूका नेहमीच सहकारी राजकीय क्षेत्रात सतत चर्चेत राहिला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सहकारी दूध संस्थाचा आणि याद्वारे त्यांच्या होत असणा–या सबलीकरणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून चंदगड तालुक्यातील शिनोळी (खुर्द) व मजरे कार्वे या दोन गावातील महिलादूध संस्थाची निवड प्रस्तुत अभ्यासाठी केली आहे.

प्रस्तुत विषयाचा पध्दतशीर अभ्यास करावा असे मला वाटले. त्यामूळेच मी हा विषय संशोधनासाठी निवडला.साहित्य परिशिलानासाठी सदर विषयावर आधीच्या संशोधकांनी काही संशोधन केले आहे काय ? या विषयीचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधिकेने केला पण महिला आणि दूध संस्था या विषयीची काही व्यष्टी अध्ययने वगळता 'सहकारी दूधसंस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण या विशिष्ठ विषयावर

करण्यात आलेली फारशी संशोधने प्रस्तुत संशोधिकेला आढळली नाही. त्यामुळे अन्वेषणात्मक स्वरूपाचे संशोधन करण्याचे संशोधिकेने ठरविले.

## २.३.३ संशोधन समस्या

"सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण" असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. सहकारी दूध संस्थामूळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण (सक्षमीकरण) घडून येत आहे काय? हे अभ्यासणे ही सदर अभ्यासाची समस्या आहे.

## २.३.४ संशोधनाची उदद्दीष्टे

ग्रामीण महिलांच्या सबलीकरणातील व सहकारी महिला दूध संस्थाची भूमिका समजून घेणे हे प्रस्तुत संशोधनाचे सर्वसाधारण उदिद्ष्ट आहे.

या संशोधनाची विशिष्ठ उदिद्ष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. निवडक सहकारी महिला दूध संस्थांचा परिचय करून घेणे ( Their emergence and development ).

२. सहकारी महिला दूध संस्थेतील संचालक, आणि सभासद महिलांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण महिलांच्या सबलीकरणामधील सहकारी महिला दूध संस्थाच्या भूमिकेचा अभ्यास करणे

## २.३.५ संशोधन क्षेत्र

सदरचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील शिन्नोळी (खुर्द) व मजरे कार्वे या दोन गावांची निवड केली त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) चंदगड तालुक्यात विविध सहकारी संस्थाचे जाळे विणले गेले असून तालुक्यात अनेक गावात महिलांच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत.त्यामुळे अभ्यसाासाठी अशा दोन संस्थाची निवड करणे संशोधिकेला सोयीचे होते.

२) संशोधिका ही चंदगड तालुक्यातील मु.पो. डुक्करवाडी या गावची कायमची रहिवाशी असल्यामुळे अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेल्या संपूर्ण परिसराची चांगली माहिती आहे. तसेच येथील सामाजिक संपर्कामुळे उत्तरदात्यांकडून संशोधनासाठी उपयुक्त माहिती संकलित करणे सोयीचे होते.

वरील बाबी ध्यानात घेऊन चंदगड तालुका हे अभ्यास क्षेत्र निवडण्यात आले.

## २.३.६ संशोधनासाठी संस्थाची निवड


या परिक्षेत्रातील सर्वच सहकारी संस्थामूळे प्रत्यक्ष , अप्रत्यक्ष,पणे महिलांच्या सामाजिक आर्थिक दर्जात परिवर्तन होत आहे हे खरे असले तरी प्रस्तुत अभ्यासासाठी केवळ महिला सहकारी दूध संस्थाची निवड करण्याचे ठरविले त्यानुसार या संशोधनासाठी चंदगड तालुक्यातील ३१ मार्च २००३ पर्यंत नोंदणीकृत असलेल्या ३५ संस्थापैकी दोन संस्थाची निवड सहेतूक नमूना निवड पध्दतीने करण्यात आली. संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती पुरवि‍ण्या बाबतचे संस्थेचे व सभासदांचे अपेक्षित सहकार्य लाभण्याची शक्यता आणि संशोधिकेची सोय या दोन निकषांच्या आधारे खालील दोन संस्थाची निवड करण्यात आली.

१) शिनोळी (खुर्द) श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित शिनोळी खूर्द ता. चंदगड, जि कोल्हापूर के.पी. आर.सी.जीडी/ए.जी.आर(ओ) १५५२ (डी) कोड नं १८७४–९६ दि २६.११.१९९६


२) मजरेकार्वे येथील श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित , मजरे कार्वे, नोंदणी कमांक के.पी.आर./सी.जी.डी ऐ.जी.आर(ओ) २०१९(ड) ९९–२०००/९९ दि २२.०७.१९९९

नकाशा क १ : कोल्हापूर जिल्हयाचा नकाशा व त्यामध्ये चंदगड तालुका दर्शविला आहे.

नकाशा क्र. २ : चंदगड तालुका आणि त्यातील निवडलेल्या संस्थांच्या गावांची ठिकाणे पुढील पानावरील नकाशात दर्शविली आहेत)


KOLHAPUR DISTRICT
SHAHUWADI
PANHALA
HATKANAN-GLE
SHIROL
KOLHAPUR
KARVEER
G.BAWDA
RADHANAGAR
KAGAL
BHUDARGAD
AJRA
GADHINGLAJ
CHANDGAD
N
0
10
20 Kms
INDEX
TAHSIL HEAD QUARTER
DISTRICT HEAD QUARTER
INDIA
LOCATION OF KOLHAPUR DISTRICT
INDIA
MAHARASHTRA
KOLHAPUR
68°
72°
76°
80°
84°
88°
92°
96°
36°
32°
28°
24°
20°
16°
12°
8°

# TAHSIL CHANDGAD



## २.३.७ उत्तरदात्यांची निवड

सदर संशोधनासाठी महिलांच्या सहकारी दूध संस्थाची निवड केल्यानंतर ज्यांच्याकडून प्राथमिक माहिती संकलित करावयाची होती अशा महिलांची निवड करण्यासाठी खालील पध्दत वापरली.प्रथम निवडलेल्या महिला सहकारी दूधसंस्थाच्या कार्यालयांना भेटी दिल्या त्या त्या संस्थेतील स्त्री संचालक मंडळ व संभासद संख्या किती आहे या विषयाची माहिती संकलित केली त्या वरून पुढीलप्रमाणे चित्र स्पष्ट झाले.

सारणी क्रमांक २.३.१

अभ्यासासाठी निवडलेल्या संस्थेची माहिती

| अ. क्र | संस्थेचे नांव | संचालक मंडळाची सदस्य संख्या | एकूण महिला सभासद |
|---|---|---|---|
| १ | श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित शिनोळी खूर्द ता. चंदगड, जि कोल्हापूर | ११ | ४६ |
| २ | श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित , मजरे कार्वे, ता. चंदगड, जि. वकेल्हापूर | ९ | ७३ |
| | एकूण | २० | ११९ |

अभ्यासासाठी वरील समग्रातून नमूना निवडायचा होता वरील दोन्ही संस्थामधील महिलांचे प्रतिनिधित्व नमुन्यात असावे असे ठरविण्यात आले.संशोधिकेजवळ उपलब्ध असणारी वेळ, श्रम आणि पैसा या स्वरूपातील साधनसामग्री लक्षात घेऊन दोन संस्थामधील ४५ महिला उत्तर दात्यांची निवड हेतूनिष्ठ नमूना निवड (Purposive Sampling Technique) या तंत्राचा अवलंब करून करण्याचे ठरविले त्यानुसार ४५

महिला उत्तर दात्यांची निवड केली. खालील सारणीवरून अभ्यासासाठी निवडलेल्या नमूना निवडीविषयीचे चित्र स्पष्ट होईल.

सारणी क्रमांक २.३.२

मुलाखत अनूसूचीसाठी नमूना निवड

| अ. क्र | संस्थेचे नांव | एकूण महिला सभासद | निवडलेल्या नमून्याची संख्या | एकूण टक्केवारी | नमुना निवडीचे चित्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित शिनोळी खूर्द ता. चंदगड, जि कोल्हापूर | ४६ | २० | ४३.४७ ½ | हेतूनिष्ठ नमूना निवड |
| २ | श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित , मजरे कार्वे, | ७३ | २५ | ३४.२४ ½ | हेतूनिष्ठ नमूना निवड |
| | एकूण | ११९ | ४५ | ३७.८१ ½ | |

## २.३.८ तथ्य संकलनासाठी वापरलेले साधन

अभ्यासासाठीची उदिष्टे लक्षात घेऊन तथ्य संकलन करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. वरील पैकी दोन्ही संस्थेतील पाच पाच सभासदांची मुलाखत घेऊन अनुसूचीची पुर्वचाचणी घेण्यात आली. योग्य त्या दुरूस्त्या करून मुलाखत

अनूसूचित काही बदल करण्यात आले आणि अंतिम मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली

## २.३.९ तथ्य संकलन

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील महिला सदस्यांकडून सदर मुलाखत अनुसूचिच्या सहाय्याने सेशोधिकेने स्वतः मुलाखती धेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलानाचे काम १ नोव्हेंबर २००२ ते ३० नोव्हेंबर २००२ या कालावधीत करण्यात आले.

## २.३.१० संकलीत माहितीचे वर्गीकरण

संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून सारण्या तयार करण्यात आल्या.सदर सारणीतील वर्गीकृत माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

## २.३.११ संशोधनाच्या मर्यादा

१) सदर संशोधनासाठी चंदगड तालुक्यातील ३५ महिला सहकारी दूध संस्थापैकी दोनच महिला सहकारी दूध संस्थाची निवड करण्यात आली त्यामूळे संशोधनाचे निष्कर्ष प्रामुख्याने या दोन संख्या पूरते मर्यादित आहेत

२) संशोधनासाठी सर्वेक्षणापेक्षा व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब झाला असता तर अधिक चांगले निष्कर्ष मांडता आले असते.

## २.३.१२ प्रकरण नियोजन

संकलित केलेल्या माहितीचे अर्थपूर्ण संघटन करून खालील प्रकरणात अहवालाची विभागणी करण्यात आली.

**प्रकरण पहिले :** कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थांचा विकास

**प्रकरण दुसरे :** संकल्पनात्मक संदर्भचौकट आणि पध्दतीशास्त्र

**प्रकरण तिसरे :** सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण

**प्रकरण चौथे :** सांरांश आणि निष्कर्ष

## References :


1 Athreya Geeta (1986) "Indian Women :A Study of their role in the dairy Movement", Marty Chen, Manoshi, Mitra, Geeta Athreya, Anila Dholakia Preeta Law, Aruna Roa, Shakti Books, New Delhi, pp.107-123.

2. Chain Marty and Athreya Geeta (1986) "Indian Women, A Study of their role in the dairy Movement" Marty Chen, Manoshi, Mitra, Geeta Anthreya, Anila Dholkian Preeta Low, Aruna Roa, Shakti Books, New Delhi, pp.47-69

3. Chain Marty and Dholakia Anila (1986) "Indian Women,:A Study of their role in the dairy Movement" Marty Chen, Manoshi, Mitra, Geeta Anthreya, Anila Dholkian Preeta Low, Aruna Roa, Shakti Books, New Delhi, pp.70-106.

4. Dholkia Anita (1984) "Women in White revolution" Paper presented in National seminar, New Delhi.

5. Jain S. P. (1998) "Empowerment of Rural Women Through Local Self Government in Afro Asian Countries", Journal of Rural Recons Vol – 31(2), pp.37-50.

| | | |
|---|---|---|
| 6. | Jain Devaki (1980) | "Womens quest for power" Associated by Nalinisingh. Malini Chand, Vikas Publishing House Pvt. Ltd., Delhi. pp 70-75. |
| 7. | Karmarkar And Ghosh (Dec. 2002) | Role of women in the self help Group : An Emerging Possibility to Co-operativization at Grass Root, Man In India, Vol 82, No. 3 &4' pp. 441-451. |
| 8 | Kamble A. R.(2000) | "Women Leadership in Panchayati raj : A Sociological study" un published Ph.D. Thesis, Shivaji Univeristy, Kolhapur, pp. 15-16. |
| 9 | Manoshi Mitra (1986) | "Indian women, A study of their role in the Dairy Movement" Marty Chen, Manoshi, Mitra, Geeta Athreya, Anila Dholakia Preeta Law, Aruna Roa, Shakti Books, New Delhi, pp. 20-46. |
| 10 | Patil Bharti (2001) | "Striyanchya Sabalikarnache:Varsha 2001", Prabodh Prakashan Jyoti; March, pp-58-61 |
| 11. | Pilai (1995:1) | "Women and empowerment", Gyan Pub., New Delhi. p.1 |

12. Rowlands J. O (1997) "Empowering women for development in experiences from some third world countries" ed. By Hells Afsher and Fatima Alikhan Pub. Booklinks co-operation, Hydrabad pp. 46-47.

13. Sharma S. L. ( 2000-March) "Empowerment without Antagonism: A case for Reformulation of women's empowerment Approach", sociological bulletin Vol. 49 pp. 19-39.

14 Singh T. R. (1981) "Role of Farm Women in Decision Making" their participation in subsidiary occupation";

Women at work : A Bibliography Anant, Rao & Kapoor (1986) SAGE Publications New Delhi;

15 Sunder p (1981) Khadgodhra –"A Case Study of women's milk co-operatives", a social action, Vol 31(1) pp. 79-78.

16 Sutar Vidya (2002) "आर्थिक विकासातील महिलांचे योगदान, सैध्दांतिक आयाम", अप्रकाशित एम. फिल. लघुशोधनिबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू